**पाहिजेत**

पत्रकार, व्हिडीओ एडिटर, स्वागतिका, टेली मार्केटिंग, मार्केटिंग प्रतिनिधी पाहिजेत. पगार 5 ते 25 हजार, शिकाऊंसाठीही संधी कागदपत्रासह भेटा

फोनः 9657069069, 0217-3550592

पत्ताः- F - 3 वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com



**नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...**



दारू... अंमली पदार्थ... गॅरंटेड सुटण्यासाठी...
व्यसन + टेन्शन + भिती + चिंता + नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश..
(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)
**डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र**
फोनः 9552619752
कॉल / व्हॉटस्‌अ‍ॅप करा... दारू... अंमली पदार्थ... राम राम करा...
501% रिझल्ट



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक १३२ वा | सोमवार, दि. २२ डिसेंबर २०२५ | पाने ४ | पोष्ट परवानाः - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


# पालकमंत्री गोरेंच्या 'मिशन लोटस'ला फटका

## अति आत्मविश्वास, स्थानिक नेत्यांतील विसंवाद आणि विरोधकांच्या रणनीतीमुळे भाजपचा पराभव

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यातील नगरपालिकांच्या निवडणुकांचे निकाल जाहीर होताच जिल्ह्याच्या राजकारणात मोठी उलथापालथ झाली आहे. अकलूज नगरपालिकेच्या निवडणुकीत माजी आमदार राम सातपुते यांना या निवडणुकीत मोठा धक्का बसला असून, माढा लोकसभा मतदारसंघातील तब्बल पाच नगरपालिकांमध्ये भाजपचा पराभव झाला आहे.

दरम्यान, पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या 'मिशन लोटस'लाही या निवडणुकीत मोठा फटका बसला आहे. भाजपने जिल्ह्यात मोठ्या अपेक्षेने निवडणूक लढवली होती. मात्र, अति आत्मविश्वास, स्थानिक नेत्यांतील विसंवाद आणि विरोधकांची मजबूत रणनीती यामुळे भाजपला पराभव स्वीकारावा लागला. एकूणच, सोलापूर जिल्ह्यातील या नगरपालिकांच्या निकालांनी जिल्ह्याच्या राजकारणात नवा संदेश दिला आहे.

सोलापूर जिल्ह्यातील नगरपरिषद, नगरपंचायातच्या सार्वत्रिक निवडणूकीचा मतांचा कौल समोर आला आहे. सत्तेतील विभक्त स्वतंत्रपणे लढणारे राज्य आणि केंद्रात युती असणाऱ्या भाजपा आणि शिवसेना शिंदे गटाने विजयाची बाजी मारली आहे. भाजपा ४, शिवसेना शिंदे गट ३, स्थानिक आघाड्या ३, शरद पवारांची राष्ट्रवादी १, शिवसेना उबाठा १ जागेवर नगरपरिषदेच्या चुरशीच्या लढतीत पक्षांना यश प्राप्त झाले आहे.

आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या नेतृत्वाखाली घेण्यात आलेल्या तीन नगरपरिषदेच्या निवडणूकीत अकलकोट आणि मैंदर्गी नगरपरिषद मध्ये घवघवीत यश मिळाले आहे. तर मंगळवेढा पंढरपूरचे भाजपा आमदार समाधान आवताडे यांच्या हातातून मंगळवेढा आणि पंढरपूर नगरपरिषद निसटल्या आहेत. आवताडे यांचे नातेवाईक सुनंदा

### सत्तेतील मित्र पक्षांनी मारली विजयाची बाजी







आवताडे मंगळवेढा तर पंढरपूर स्व. आमदार भारत भालके यांच्या सुन डॉ. प्रणिता भालके या स्थानिक आघाडीतुन विजयी झाल्या आहेत. यासह भाजपाने बार्शी नगरपरिषदेत माजी आमदार राजेंद्र राऊत यांच्या नेतृत्वाखाली विजय मिळविला आहे. तर अनगर नगरपंचायत माजी आमदार राजन पाटील यांनी बिनविरोध केली आहे. राजन पाटील यांनी गेल्या महीन्यात भाजपा पक्षात प्रवेश केला आहे. जिल्ह्यात १२ पैकी भाजपाला ३ नगर परिषद आणि १ नगरपंचायात खेचण्यात यश प्राप्त झाले आहे.

शिवसेना शिंदे गटाने जोरदार मुसंडी मारली आहे. माजी गृहराज्यमंत्री सिध्दाराम म्हेत्रे यांच्या नेतृत्वाखाली शिंदेसेनेचे नगराध्यक्षांसह २२ उमेदवार विजयी झाले आहेत. यासह सांगोल्यात माजी आमदार शहाजीबापू पाटील यांनी शिंदेसेनेचा झेंडा नगरपरिषेदेवर फडकविला आहे. मोहोळमध्ये प्रथमचं शिंदेसेनेचा नगराध्यक्ष निवडून आला आहे. कुर्डुवाडी नगरपरिषदेत शिवसेना उबाठा गटाने आपले स्थान आबाधीत ठेवले आहे.

करमाळा नगरपरिषदेवर स्थानिक आघाडीचा प्रभाव दिसून आला. सावंत गटाने वर्चस्व स्थापन केले आहे. जिल्ह्याचे लक्ष लागून राहीलेल्या अकलूज नगरपरिषद सवार्धीक चर्चेत राहीली. खासदार धैर्यशील मोहीते पाटील यांच्या नेतृत्वाखाली शरद पवारांच्या राष्ट्रवादीकडून निवडणूक लढविण्यात आली. या निवडणूकीत शरद पवारांच्या राष्ट्रवादीने यश संपादन केले. अजित पवार गट आणि भाजपाने उभा केलेल्या नगरध्यक्षपदाचा उमेदवार यांचा दारूण पराभव झाला आहे.

| पक्षीय बलाबल | |
|---|---|
| भाजपा | ०४ |
| शिवसेना एकनाथ शिंदे गट | ०३ |
| तीर्थक्षेत्र विकास आघाडी | ०२ |
| शिवसेना उद्धव ठाकरे गट | ०१ |
| राष्ट्रवादी शरद पवार गट | ०१ |
| स्थानिक विकास आघाडी | ०१ |
| **एकूण** | १२ |

**सोलापूर नगरपरिषद निवडणूक निकाल नगराध्यक्ष**

- अक्कलकोट – मिलन कल्याणशेट्टी (भाजपा)
- मैंदर्गी – अंजली बाजारमठ (भाजपा)
- बार्शी – तेजस्विनी कथले (भाजप)
- अनगर – प्राजक्ता पाटील (भाजपा)
- दुधनी – प्रथमेश म्हेत्रे (शिवसेना शिंदे गट)
- सांगोला – आनंदा माने (शिवसेना शिंदे गट)
- मोहोळ – सिद्धी वस्त्रे (शिवसेना शिंदे गट)
- कुडूर्वाडी – जयश्री भिसे (शिवसेना ठाकरे गट)
- मंगळवेढा – सुनंदा अवताडे (तीर्थक्षेत्र विकास आघाडी)
- अकलूज – रेशमा अडगळे (शरदचंद्र पवार राष्ट्रवादी)
- करमाळा – मोहिनी सावंत (स्थानिक विकास आघाडी)
- पंढरपूर – डॉ. प्रणिता भालके (तीर्थक्षेत्र विकास आघाडी)

# अकलूज नगरपरिषदेच्या निवडणूक महासंग्रामात तुतारी वाजली



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** शंभू महादेवाच्या सानिध्यात, शून्यातून विश्व निर्माण करणाऱ्या माळशिरस तालुक्यातील अकलूज नगरपरिषदेची पहिलीच निवडणूक, नुकतीच वाजत गाजत आणि आरोप प्रत्यारोच्या चक्री वादळात पार पडली. प्रसंगी निवडणुकीच्या रणांगणात, एका बाजूला सत्ताधीश कमळ डोलत होते तर एका बाजूला तुतारीच्या सुमधुर आवाजात केलेली विकास कामे बोलत होते,म्हणूनच अकलूजच्या जनतेने मोहिते पाटील यांच्या बाजूने कौल देत सत्ताधारी भाजपला मोठा धक्का दिला.

राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरद पवार पक्षाच्या रेशमा लालासाहेब अडगळे यांनी 12329 मते मिळवत भाजप उमेदवार पूजा कोतमिरे यांचा पराभव केला. चुरशीच्या लढतीत भाजपने 4 जागा जिंकल्या तर राष्ट्रवादी शरद पवार पक्षाने नगराध्यक्ष व 22 जागा जिंकत अकलूज नगरपरिषदेवर विजयाचा झेंडा फडकवला.यामध्ये शिवसेना ठाकरे पक्षाच्या 2 उमेदवारांचा समावेश आहे.

अकलूज नगरपरिषदेसाठी भाजप, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष शरद पवार,राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष अजित पवार, या तीन पक्षामध्ये मुख्य लढत होती. 2 डिसेंबर रोजी 34 हजार 408 मतदारापैकी 23 हजार 817 मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला होता.12 हजार 161पुरुष व 11हजार 650 महिला मतदारांनी 13 प्रभागातील 39 बुथवर 69.22 टक्के मतदान केले होते.

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष (शरद पवार) प्रचार सभेत राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील, जयसिंह मोहिते पाटील यांचा सहभाग महत्वाचा ठरला तर खासदार धैर्यशील मोहिते पाटील व शिवतेजसिंह मोहिते पाटील यांनी विकास मुद्द्यांवर प्रचार सभा गाजवली.

# २२ वर्षीय सिद्धी वस्त्रे बनली नगराध्यक्ष



**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** मोहोळ नगरपरिषदेत शिवसेनेच्या सिद्धी वस्त्रे या नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीत विजयी झाल्या आहेत. वयाच्या २२ व्या वर्षी सिद्धी वस्त्रे नगराध्यक्ष बनलीय. मोहोळमध्ये शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाने युती केली होती.

सिद्धी वस्त्रेसह मोहोळमधील उमेदवारांसाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची सभा झाली होती. सिद्धी वस्त्रे यांच्यावर विरोधकांकडून टीकाही करण्यात आली होती. या टीकेला आता विजयानंतर सिद्धी यांनी प्रतिक्रिया देताना कामातून उत्तर देऊ असं म्हटलंय.

सिद्धी वस्त्रे म्हणाल्या की, आज मला सर्वांनी जी संधी दिली त्यासाठी आम्ही मोठा विजयोत्सव करतोय. माझ्यावर ज्यांनी टीका केली त्यांच्या टीकेवर मात म्हणजे आमचा विजय आहे. याचा आम्हाला मोठा आनंद झाला आहे. यापुढे समाजासाठी काम करायचं असून पक्ष वगैरे न बघता आम्ही कामं करू. जनतेचे प्रश्न सोडवण्याला प्राधान्य देऊ.

मोहोळमध्ये अनेक मोठ्या सभा झाल्या. त्या सभांमध्ये विरोधकांकडून टीकाही केली गेली. या टीकेबद्दल बोलताना सिद्धी वस्त्रे यांनी म्हटलं की, आमचं जे काही उत्तर आहे ते कामातूनच देऊ. आमचं काम हेच टीका करणाऱ्यांसाठी उत्तर असणार आहे.

नगरपरिषदेच्या प्रभाग क्रमांक ३ ब व प्रभाग क्रमांक ५ अ या दोन जागांसाठी शनिवारी मतदान झाले. दोन प्रभागात मिळून एकूण ५ हजार २१७ मतदार होते. त्यापैकी ३४९५ मतदारांनी मतदान केले. एकूण ६६.९९ टक्के मतदान झाले. यापूर्वी २ डिसेंबरला मोहोळ नगर परिषदेच्या १८ जागांसाठी निवडणूक झाली होती.

प्रभाग क्रमांक ३ ब व प्रभाग क्रमांक ५ अ या दोन जागांची निवडणूक न्यायालयीन प्रक्रियेमुळे पुढे गेल्याने २० डिसेंबर रोजी घेण्यात आली. प्रभाग क्रमांक ३ ब मध्ये एकूण २७०६ मतदान होते. त्यापैकी १९०८ इतके मतदान झाले होते. तर प्रभाग क्रमांक ५ अ मध्ये २५११ इतके मतदान होते. त्यापैकी १५८७ इतके मतदान झाले. दोन्ही प्रभागांमध्ये अत्यंत चुरशीने मतदान झाले होते.

# बार्शी नगरपरिषदेवर महायुतीचा झेंडा!



**बार्शी (कटूसत्य वृत्त):-** बार्शीनगरपरिषदेच्या अत्यंत चुरशीच्या झालेल्या निवडणुकीत अखेर माजी आमदार राजेंद्र राऊत यांच्या नेतृत्वाखालील महायुतीने 23 जागा जिंकत सत्ता कायम राखली.

तर विद्यमान आमदार दिलीप सोपल यांच्या गटाने 19 जागा जिंकून चांगलीच लढत दिली.

नगराध्यक्षपदाच्या थेट निवडणुकीत भारतीय जनता पार्टीच्या तेजस्विनी कथले यांनी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या निर्मला बारबोले यांचा 4,688 मतांनी पराभव करत नगराध्यक्षपद काबीज केले.

शासकीय धान्य गोदाम येथे 21 प्रभागांतील 42 नगरसेवक तसेच थेट नगराध्यक्षपदासाठी रविवारी सकाळी 10 वाजल्यापासून मतमोजणीस सुरुवात झाली. 12 टेबलांवर 11 फेऱ्यांमध्ये मतमोजणी पार पडली. सर्व प्रभागांचे निकाल निवडणूक निर्णय अधिकारी अमोल सिंह भोसले, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तैमूर मुलाणी आणि राज्य निवडणूक निरीक्षक विक्रमसिंह देशमुख यांनी जाहीर केले. सुरुवातीपासूनच नगराध्यक्षपदाच्या उमेदवारांनी घेतलेली आघाडी शेवटपर्यंत कायम राहिली. मात्र विद्यमान नगरसेवक ॲड. महेश जगताप आणि रोहित लाकाळ यांना पराभवाचा सामना करावा लागला.

बार्शी शहरातील सर्वात प्रतिष्ठेच्या मानल्या जाणाऱ्या प्रभाग क्रमांक 6 मध्ये माजी विरोधी पक्षनेते नागेश अक्कलकोटे यांनी 863 मतांच्या फरकाने एकतर्फी विजय मिळवला. तर प्रभाग 19 मध्ये भाजपचे भारत पवार यांना केवळ 7 मतांनी निसटता विजय मिळाला. प्रभाग 7 मध्ये भाजप-शिवसेना युतीचे उमेदवार संदेश काकडे यांनी सुमारे 2,500 मतांच्या सर्वाधिक फरकाने विजय मिळवत आपली जागा कायम राखली. दरम्यान, प्रभाग 7 मधून युतीच्या उमेदवार मीरा नाळे या यापूर्वीच बिनविरोध निवडून आल्या होत्या.

थेट नगराध्यक्षपदासाठी शहरातील सर्व 21 प्रभागांतील मतदान केंद्रांमधून भाजपच्या तेजस्विनी कथले यांना एकूण 35,879 मते, तर शिवसेना (उबाठा) पक्षाच्या निर्मला बारबोले यांना 31,191 मते मिळाली. कथले यांनी बारबोले यांचा 4,688 मतांनी पराभव केला.


सुरुवातीपासूनचा नगराध्यक्षपदाच्या उमेदवारांनी घेतलेली आघाडी शेवटपर्यंत कायम राहिली. मात्र विद्यमान नगरसेवक ॲड. महेश जगताप आणि रोहित लाकाळ यांना पराभवाचा सामना करावा लागला.

बार्शी शहरातील सर्वात प्रतिष्ठेच्या मानल्या जाणाऱ्या प्रभाग क्रमांक 6 मध्ये माजी विरोधी पक्षनेते नागेश अक्कलकोटे यांनी 863 मतांच्या फरकाने एकतर्फी विजय मिळवला. तर प्रभाग 19 मध्ये भाजपचे भारत पवार यांना केवळ 7 मतांनी निसटता विजय मिळाला. प्रभाग 7 मध्ये भाजप-शिवसेना युतीचे उमेदवार संदेश काकडे यांनी सुमारे 2,500 मतांच्या सर्वाधिक फरकाने विजय मिळवत आपली जागा कायम राखली. दरम्यान, प्रभाग 7 मधून युतीच्या उमेदवार मीरा नाळे या यापूर्वीच बिनविरोध निवडून आल्या होत्या.

थेट नगराध्यक्षपदासाठी शहरातील सर्व 21 प्रभागांतील मतदान केंद्रांमधून भाजपच्या तेजस्विनी कथले यांना एकूण 35,879 मते, तर शिवसेना (उबाठा) पक्षाच्या निर्मला बारबोले यांना 31,191 मते मिळाली. कथले यांनी बारबोले यांचा 4,688 मतांनी पराभव केला.


# अक्कलकोट नगरपरिषद निवडणुकीत भाजपचा झंझावात

## मिलन दादा कल्याणशेट्टी नगराध्यक्ष



**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** अक्कलकोट नगरपरिषद निवडणुकीत भारतीय जनता पक्षने दणदणीत विजय मिळवत नगरपरिषदेवर आपले वर्चस्व सिद्ध केले आहे. नगराध्यक्षपदी भाजपचे मिलन दादा कल्याणशेट्टी विजयी झाले असून, नगरपरिषदेतील एकूण २५ जागांपैकी २२ जागांवर भाजपच्या उमेदवारांनी विजय मिळवला आहे.

या निवडणुकीत भाजपने स्पष्ट बहुमत मिळवत नगरपरिषदेत सत्ता प्रस्थापित केली आहे. विरोधी पक्षांना मर्यादित यश मिळाले असून, शिवसेना (शिंदे गट) चे दोन उमेदवार विजयी (पान 2 वर..)

# दुधनी नगरपरिषदेत शिवसेनेचा झंझावात





**दुधनी (कटूसत्य वृत्त):-** दुधनी नगरपरिषद निवडणुकीत राजकीय इतिहासात नोंद होईल असा निकाल लागला असून, नगराध्यक्ष पदाचे उमेदवार प्रथमेश म्हैत्रे हे दणदणीत विजयासह निवडून आले आहेत. विशेष म्हणजे नगरपरिषदेतील २१ पैकी २१ जागांवर शिवसेना उमेदवार विजयी झाले असून, शिवसेनेने संपूर्ण नगरपरिषदेत निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित केले आहे. मतमोजणीच्या सुरुवातीपासूनच शिवसेनेच्या उमेदवारांनी आघाडी घेतली होती. प्रत्येक फेरीत आघाडी कायम राखत अखेर नगराध्यक्ष पदावर प्रथमेश म्हैत्रे यांचा विजय निश्चित झाला. निकाल जाहीर होताच दुधनी शहरात शिवसैनिक व समर्थकांमध्ये उत्साहाचे वातावरण पसरले. फटाक्यांची आतषबाजी, घोषणाबाजी आणि जल्लोष करत विजय साजरा करण्यात आला.

या निवडणुकीत विकास, पारदर्शक प्रशासन आणि जनतेशी थेट संवाद (पान 2 वर..)

# सांगोला नगरपरिषदेवर शहाजीबापूंच्या शिवसेनेचा भगवा

**सांगोला (कटूसत्य वृत्त):-** संपूर्ण राज्याचे लक्ष लागून राहिलेल्या सांगोला नगरपरिषद निवडणुकीत शिवसेना (शिंदे गट) नेते माजी आमदार शहाजीबापू पाटील यांनी विरोधकांचा धुव्वा उडवत ऐतिहासिक विजय मिळवला आहे. नगराध्यक्ष पदाच्या चुरशीच्या लढतीत आनंदा माने यांनी पाच हजाराहून अधिक मताधिक्याने विजय मिळवला असून, नगरपरिषदेच्या २४ पैकी तब्बल १५ जागांवर विजय मिळवत शहाजीबापूंनी निर्विवाद वर्चस्व सिद्ध केले आहे.

**विरोधकांना मोठा धक्का; राजकीय समीकरणे बदलली**

या निवडणुकीत शिवसेना (शिंदे गट) विरोधात शेतकरी कामगार पक्ष, भारतीय जनता पार्टी आणि दीपक साळुंखे गट यांची 'शहर विकास आघाडी' एकत्र आली होती. मात्र, या तगड्या आघाडीला केवळ ०८ जागांवर समाधान मानावे लागले. शहाजीबापूंनी रचलेल्या चक्रव्यूहात दिग्गज नेत्यांच्या नेतृत्वाखालील आघाडीचा पराभव झाल्याने सांगोल्याच्या राजकारणात मोठी उलथापालथ झाली आहे.

**'हा विकासाचा विजय' – शहाजीबापू पाटील**

विजयानंतर पत्रकारांशी बोलताना शहाजीबापू पाटील म्हणाले की, 'सांगोल्याच्या जनतेने विकासाला साथ दिली आहे. शहराचा कायापालट करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. १५ नगरसेवक आणि नगराध्यक्ष असा आमचा पूर्ण संघ आता शहराच्या प्रलंबित प्रश्नांवर काम करेल.'

# भगीरथ भालके यांनी तब्बल 14 वर्षानंतर सत्तांतर घडवून आणले

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** पंढरपूर नगर परिषदेच्या तीर्थक्षेत्र विकास आघाडीच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवार प्रणिता भालके या विजयी झाल्या आहेत. या विजयानंतर त्यांचे आठ वर्षाचे चिरंजीव शौर्य भगीरथ भालके यांचा व्हिडीओ चांगलाच व्हायरल झाला आहे. विजयी रॅलीत शौर्य भालके याने दंड थोपटत भाजप नेते प्रशांत परिचारक यांना इशारा दिला आहे.

पंढरपूर नगर परिषदेचे तीर्थक्षेत्र विकास आघाडीच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवार प्रणिता भालके या विजयी झाल्या आहेत. जवळपास 11 हजार 500 मतांनी प्रणिता भालके विजयी झाल्या आहेत. त्यांनी भाजपचे उमेदवार शामला शिरसाट यांचा पराभव केला आहे. या विजयानंतर प्रणिता भालके यांचे चिरंजीव शौर्य भगीरथ भालके यांनी दंड थोपटले आहेत.



## संपादकीय

# महापालिकांचा रणसंग्राम

स्थानिक स्वराज्य संस्थांपैकी दुर्सया टप्प्यात आता राज्यातील महानगरपालिका निवडणुकांची घोषणा झाल्याने गेली पाच वर्षे ठप्प झालेला शहरांचा कारभार हळूहळू सुरळीत होणार असून या संस्थांवरील प्रशासकराज संपुष्टात आणण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. साहजिकच या घोषणेचे स्वागत झाले. लोकशाहीत विकासाची सूत्रे लोकांच्या हाती असणे महत्त्वाचे असते आणि ती बंद झालेली दारे उशिरा का असेना एकदाची उघडली. राज्यात नुकत्याच नगरपालिका व नगर परिषदांच्या निवडणुका पार पडल्या. त्यानंतर आता सर्वच्या सर्व म्हणजे 29 महापालिकांसाठी, मकर संक्रांतीच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे येत्या 15 जानेवारीला मतदान होणार आहे.

या निवडणुकीनंतर राज्यातील 34 जिल्हा परिषदांच्या निवडणुका पार पडतील आणि स्थानिक स्वराज्य संस्थांचे काम सुरू होईल, म्हणजेच लोकांनी चालवलेली व्यवस्था खंयाअथार्ने अस्तित्वात येईल. महानगरपालिका निवडणुकीची घोषणा झाल्याने राज्यात नव्याने राजकीय संघर्ष उफाळणार आहे. मुंबई, ठाणे, पुणे, पिंपरी-चिंचवडमधून त्याची सुरुवातही झाली. या घडामोडींत सत्तेतील महायुती आणि विरोधातील महाविकास आघाडीचा युती टिकवण्यात, सहकारी पक्षांना सोबत ठेवण्यात कस लागणार आहेच शिवाय स्थानिक पातळीवर नवी राजकीय समीकरणेही उदयास येण्याची शक्यता दिसते.मुंबई, नागपूर, पुणे, नवी मुंबई, कल्याण-डोंबिवली, कोल्हापूर आदी महापालिकांमध्ये चार ते पाच वर्षांची प्रशासकांची राजवट संपून, लोकप्रतिनिधींच्या हातात पुन्हा एकदा कारभार जाणार आहे. इतके दिवस प्रशासकांच्याच हातात कारभार केंद्रित असल्यामुळे जनतेच्या प्रश्नांची योग्य त्या प्रमाणात तड लावली जात नव्हती. कुठल्याही पक्षाचा जरी असला, तरी शेवटी लोकप्रतिनिधी हा जनतेत जाऊन काम करणारा असतो. त्यामुळे त्याची जागा अधिकारीवर्ग घेऊ शकत नाही. त्या अथार्ने शहरांच्या विकासाची कोंडी झाली होती. सामान्य नागरिकांनी दाद कोणाकडे मागायची, असा प्रश्न होता. तो अखेर सुटला.आचारसंहिता जाहीर होण्यापूर्वी महायुती सरकारने ठाणे महापालिकेसाठी 202 कोटी रुपयांचा, तर नागपूर महापालिकेसाठी 134 कोटी रुपयांचा निधी मंजूर केला. गेल्या लोकसभा व विधानसभा निवडणुका, तसेच नगरपरिषदांच्या निवडणुकांच्या वेळीदेखील महायुती सरकारने वेगवेगळी पॅकेजेस घोषित केली होती. आचारसंहितेच्या अगोदरचा मुहूर्त पकडून जेव्हा अचानक योजनांचा व निधीचा वर्षाव होतो, तेव्हा त्याबाबत सामान्यांच्या मनात शंका निर्माण होणे स्वाभाविक असते. आता महायुती विरुद्ध महाविकास आघाडी असा सामना राज्यात रंगणार असला, तरी याला काही ठिकाणी अपवाद असणार आहेत. पिंपरी-चिंचवडमध्ये उपमुख्यमंत्री अजित पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस आणि भाजप हे एकमेकांसमोर उभे ठाकणार आहेत. कारण, एकत्र लढल्यास त्याचा फायदा विरोधकांना होईल, असा हिशेब आहे; परंतु या दोन्ही ठिकाणी शरद पवार आणि अजित पवार यांचे पक्ष एकत्र येणार असल्याची शक्यता असल्या कारणाने शरद पवार यांच्या राजकारणाची पुढील दिशा काय असेल, याबाबतचा अंदाज बांधता येऊ शकतो. एकनाथ शिंदे यांची शिवसेना राज्यात भाजपसोबत असेल आणि बहुतांश महापालिकांमध्ये आम्ही एकत्र लढू, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.त्यामुळे मुंबई, ठाणे आणि नाशिक आदी ठिकाणी महायुती एकत्रितपणे लढेल. 2017 मध्ये शिवसेना व भाजप हे त्यावेळी राज्यात सत्तेत असलेले दोन पक्ष मुंबई, कल्याण, डोंबिवली आदी ठिकाणी परस्परांविरुद्ध लढले होते; मात्र यावेळी नागपूर व विदभार्तील अन्य महापालिकांमध्ये भाजप स्वबळावर लढण्याच्या तयारीत आहे. विसर्जित कोल्हापूर महानगरपालिकेत काँग्रेस व एकसंध राष्ट्रवादीची सत्ता होती. आता मात्र फाटाफुटीमुळे समीकरणे बदलली आहेत. अजित पवारांसाठी पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका महत्त्वाच्या आहेत, तर एकनाथ शिंदेंसमोर ठाणे जिल्ह्यात आपले अस्तित्व कायम राखण्याचे आव्हान आहे. नगर परिषदा व नगरपंचायतींच्या निवडणुकांत काही ठिकाणचे अपवाद वगळता काँग्रेस, राष्ट्रवादी शरद पवार गट आणि उद्धव ठाकरे यांची शिवसेना हे फारसे लढण्याच्या पवित्र्यातच नव्हते; मात्र आता मुंबईसह महानगर क्षेत्रातील निवडणुका म्हणजे शिवसेना उबाठा व मनसे यांच्यासाठी अस्तित्वाचीच लढाई आहे; मात्र यामध्ये सर्वाधिक लक्ष हे देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबई महानगरपालिकेकडे असून, आशिया खंडातील या सर्वात मोठ्या महापालिकेचे आणि त्यायोगे महानगराचे भवितव्य या निवडणुकीत ठरेल. एखाद्या छोट्या राज्याइतक्या आकाराचा तिचा अर्थसंकल्प असतो.कोणत्याही स्थितीत भाजपला मुंबई महानगरपालिकेची सत्ता मिळवायची आहे. मागील निवडणुकीत 227 वॉर्डांपैकी एकसंध शिवसेनेने 84, तर भाजपने 82 जागा मिळवल्या होत्या; मात्र शिवसेनेच्या फुटीनंतर बहुसंख्य माजी नगरसेवक हे एकनाथ शिंदेंच्या पक्षात सामील झाले. मुंबईत महायुतीचा महापौर बसवण्यासाठी ठाण्यात एक नंबरचा पक्ष असलेल्या शिंदे यांना मुंबईत आपली ताकद वाढली असल्याचे सिद्ध करून दाखवावे लागेल. मुंबईत काँग्रेसने स्वबळावर निवडणुका लढवण्याचा नारा दिला असून, उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांचे पक्ष एकत्र निवडणुका लढवतील, अशी चिन्हे आहेत. अर्थात, यासंबंधी अद्याप अधिकृत घोषणा झालेली नाही. 'ब्रँड ठाकरे' कितपत प्रभावी, याचीही यावेळी परीक्षा होईल. निवडणुकीचा प्रचार सुरू होण्यापूर्वीच ॲनाकोंडा, गांडूळ, साप, रेहमान डकैत, कोथळा अशा असंसदीय शब्दांचे प्रयोग सुरू झाले आहेत. मुंबईत बरीच विकासकामे झाली असली, तरीदेखील रस्त्यांवरील खड्डे, फेरीवाल्यांचे अतिक्रमण, प्रदूषण, वाहतूक कोंडी, पावसाळ्यातील तुंबई असे अनेक महत्त्वाचे प्रश्न आहेत. मुंबई असो वा अन्य महानगरपालिका, तेथील शहर विकास आणि नियोजन या समस्यांवर या निवडणुकीच्या निमित्ताने चर्चा झाली पाहिजे.राज्यातील शहरीकरणाची प्रक्रिया गतिमान झाली असून, त्यामधून अनधिकृत बांधकामे, गुन्हेगारी असे अनेक प्रश्न जिकिरीचे बनले आहेत. सर्व पालिकांमध्ये भ्रष्टाचार तुडुंब आहे. प्रचारात केवळ चिखलफेकीपेक्षा जनतेच्या मूलभूत प्रश्नांची चर्चा व्हायला हवी. कारण, सामान्य लोक, शहरवासीय गेल्या चार-पाच वर्षांत झालेल्या दिरंगाईला खूप त्रासले आहेत, हे लक्षात घ्यायला हवे.

# माणसात माणुसकी असेल तरच तो खरा माणूस....

जगाच्या पाठीवर माणसांची संख्या अमाप आहे. जिकडे जाईल तिकडे माणसेच माणसे पाहायला मिळतात. माणसे दोन प्रकारची असतात, एक खरा माणूस आणि दुसरा मानव रूपातील क्रूर व निर्दयी असणारा हैवान माणूस. पृथ्वीतलावर दिवसेंदिवस माणसांची संख्या झपाट्याने वाढत चालली आहे.परंतु ओरिजनल माणसांची संख्या अमानुष माणसांच्या तुलनेत खूप कमी प्रमाणात आहे. आपल्याला अवतीभोवती दिसणारी ही सर्वच माणसे खरंच ओरिजनल माणसे आहेत का? त्यांच्यात मानवतेचे सर्व गुणधर्म समाविष्ट आहेत का? त्यांचे वर्तन व त्यांची वागणूक खरंच माणसासारखी आहे का? त्यांच्यात माणुसकीचे गुणधर्म नसतील तर त्यांना माणूस म्हणायचा अधिकार आहे का? या प्रश्नांची उत्तरे प्रत्येक माणसाने स्वतःच्या मनाला विचारून पहावीत. तेव्हा असे उत्तर येईल की, ओरिजनल माणसांपेक्षा अमानुष माणसांची संख्या अधिक असल्यामुळे, सध्या पृथ्वीतलावर क्रूर व निर्दयी माणसांची संख्या झपाट्याने वाढली आहे. त्याचाच परिणाम म्हणून की काय? माणूस माणसासारखे वागायचे सोडून रानटी जनावरासारखे वागत आहे. माणसासोबत माणसासारखा व्यवहार न करता हैवानासारखा व्यवहार करून माणुसकीचा पार कचरा करून टाकत आहे. हल्ली माणसात माणुसकी नावाची गोष्ट केवळ नावाला शिल्लक राहिलेली आहे. माणूस माणुसकीला धरून माणसासारखे कृत्य न करता सैतानासारखी कृत्य करून माणुसकीला लाजवत आहे. देशात वाढत चाललेला भ्रष्टाचार, महिलांवर व मुलींवर होत असलेले बलात्कार, अल्पवयीन मुलींवर होणारे लैंगिक अत्याचार, परस्त्रीसोबत होणारा व्याभिचार आणि अनाचार प्रचंड प्रमाणात वाढल्यामुळे माणुसकी नावाची गोष्ट आता लोप पावत असल्याचे चित्र सध्या सर्वत्र पाहायला मिळत आहे. लहान चिमुकली असो, तरुण मुलगी असो, जवान महिला असो किंवा म्हातारी आजी असो, या सगळ्यांवर लैंगिक अत्याचार व बलात्कार करून निर्दयी व निष्ठूर असणारे नराधम खुशाल राक्षसी कृत्य करून माणुसकीला मुठमाती देत आहेत. एकेकाळी माणसांमध्ये मानवता, बंधुता, प्रेम, आपुलकी व जिव्हाळा पाहायला मिळायचा. माणूस एकमेकांचा आदर व सन्मान करायचा. त्याकाळी माणूस शेतीच्या वाटण्या न करता सर्व भाऊ एकत्र येऊन शेती करायचे, म्हणून शेती सुद्धा भरभरून बरकत द्यायची. तेव्हा सगळे जण एकत्र कुटुंब पद्धतीत आनंदाने व सुखाने जीवन जगायचे. तेव्हा ज्येष्ठांचा आदर केला जायचा ज्येष्ठांच्या भावनांना ओळखले जायचे व त्यांना काय हवे आणि काय नको? हे पाहिले जायचे. आई-वडिलांची मान खाली जाणार नाही याची दक्षता प्रत्येक जण घ्यायचा. त्याकाळी वडीलधाऱ्या माणसांचा आदर युक्त दरारा होता. म्हणून तेव्हाची मुले व्यसन करायला व वाईट वर्तन करायला घाबरायचे. तेव्हा वृद्धाश्रमात आताच्या एवढी माणसे नव्हती. तेव्हाची पद्धत अशी होती की, जेवायचे जरी झाले तरी सर्व परिवार एकत्र बसून जेवण करायचा. एवढी माया, ममता व एकमेकांप्रती असणारा जिव्हाळा माणसांमध्ये दिसून यायचा. म्हणजे तेव्हाच्या माणसांमध्ये माणुसकी ओतप्रोत भरलेली होती. माणसांमध्ये असणारे माणुसकीचे सर्व गुणधर्म ठळकपणे दिसायचे. तेव्हाचा माणूस दुसऱ्यांच्या महिलांकडे स्वच्छ व निकोप नजरेने बघायचा. तेव्हा देशात बलात्कार, व्याभिचार, अनाचार, अत्याचार व भ्रष्टाचार आताच्या एवढा फोफावला नव्हता. माणूस माणसाला किंमत द्यायचा, संकटात व अडीअडचणीत एखादा माणूस सापडला तर त्याला संकटातून बाहेर काढण्यासाठी मदतीचे हात खूप असायचे. परंतु आता संकटात सापडलेल्या माणसाच्या मदतीला कोणीच धावून येत नाही. एखाद्याचा अपघात झाला, कोणाच्या हाणामाऱ्या झाल्या, कोणावर संकटाचा व दुःखाचा डोंगर कोसळला तर कोणीच मदतीला धाऊन येत नाही. काहीजण फोटो काढून सोशल मीडियावर व्हायरल करतात. काही माणसे बघ्याची भूमिका घेऊन तिथून निघून जातात. पण त्या माणसाला संकटातून बाहेर काढण्यासाठी कोणीच पुढे जात नाही. म्हणजे माणसात असणारी मानवता संपुष्टात आली आहे. माणसात असणारे माणुसकीचे गुणधर्म नामशेष झाले आहेत. म्हणून माणूस माणसासारखा न वागतात मनात आले तसे अमानुष गैरवर्तन करून माणुसकीला मलीन करत आहे. ज्या माणसात माणुसकी नाही, एकमेकांबद्दल प्रेमभाव व आदरभाव नाही, गोरगरीब जनतेला मदत करायची मानसिकता नाही, दारावर आलेल्या भिकाऱ्याला दान देण्याची दानत नाही. संकटात सापडलेल्या माणसाला संकट मुक्त करण्याची भावना नाही. परस्त्रीकडे चांगल्या नजरेने पाहण्याची दृष्टी नाही, आई-वडिलांना म्हातारपणात पोसण्याची धमक नाही आणि सख्ख्या भावाला आर्थिक संकटात मदत करण्याची तयारी नाही. याचा अर्थ असा की, हल्लीच्या लोकांमध्ये माणुसकीचा अभाव असल्यामुळे व माणूस अमानुषपणे वाईट कृत्य करत असल्यामुळे माणसाला माणूस म्हणायला लाज वाटत आहे. माणसाला माणूस केव्हा म्हणावे? जर त्या माणसात माणुसकी ठासून भरलेली असेल तर त्या माणसाला माणूस म्हणण्याचा अधिकार आपल्याला आहे. नाहीतर आपण कोणालाही माणूस म्हणत आहोत, पण खरा माणूस म्हणायचे असेल, तर त्या माणसामध्ये माणूसकी असायलाच हवी. जगात खऱ्या माणसांची संख्या कमी झाली आणि मानव रूपातील हैवानांची संख्या वाढली तर माणुसकीचा अंत अटळ आहे, एकदा माणुसकीचा अंत झाला तर देशाचा अंत व्हायला वेळ लागणार नाही. तुम्हाला खरा माणूस म्हणून ओळख निर्माण करायची असेल तर अगोदर माणुसकीचे सर्व गुणधर्म आत्मसात करावेच लागतील. त्यासाठी आपल्या महापुरुषांचा आदर्श घ्यावा लागेल. आणि माणसासारखे वर्तन करून माणुसकीची शोभा वाढवावी लागेल. मित्रांनो माणसात माणुसकी असेल तर आपली माणुसकीच्या नात्याने बरीच कामे होतात. रस्त्याने जात असताना टू व्हीलर वाला पायी चालणाऱ्या माणसाला गाडीवर न घेता सुसाट वेगाने जात आहे. एखाद्या वाटसरूचा रोडवर अपघात झाला आणि तो जखमी झाला तर त्याला दवाखान्यात घेऊन जाणे माणसाचे कर्तव्य असते परंतु त्याला दवाखान्यात न नेता त्याचे फोटो काढून सोशल मीडियावर व्हायरल केले जाते. माणसे बघ्याची भूमिका घेऊन तिथून निघून जातात, परिणामी त्या माणसाचा मृत्यू होतो. पण याच ठिकाणी जर कोण्या माणसाने माणुसकी दाखवली असती आणि माणुसकीच्या नात्याने, त्याला दवाखान्यात नेऊन दाखल केले असते, तर त्याचा जीव वाचला असता. आपल्यामुळे एखाद्याचा जीव वाचत असेल तर आपण देव माणूस आहात असे समजावे. आपल्यामुळे दुसऱ्याचे भले होत असेल किंवा एखाद्याचा जीव वाचत असेल तर आपल्याला जीवनात मिळणारा आनंद गगनात न मावणारा असेल. म्हणून बांधवांनो आपल्याला जीवनात चांगला व खरा माणूस म्हणून आपली ओळख निर्माण करायची असेल तर अगोदर आपल्याला खरा माणूस बनावे लागेल...त्यासाठी अंगी माणुसकी ठासून भरलेली असायला हवी, कारण माणसात माणुसकी असेल तरच तो खरा माणूस आहे असे समजावे.

**- बुद्धभूषण चंद्रकांत कांबळे**
खंडाळी, ता.अहमदपूर
जिल्हा लातूर
मो. 7498715661

पान १ वरून

## दुधनी नगरपरिषदेत...

या मुद्द्यांवर शिवसेनेला मतदारांनी भरभरून कौल दिल्याचे बोलले जात आहे. २१ पैकी २१ जागा जिंकत 'क्लीन स्वीप' साध्य झाल्याने दुधनी नगरपरिषदेवर शिवसेनेचे एकहाती नियंत्रण आले आहे.

विजयानंतर बोलताना नवनिर्वाचित नगराध्यक्ष प्रथमेश म्हैत्रे यांनी दुधनीतील जनतेचे आभार मानत, 'हा विजय केवळ माझा नसून संपूर्ण शिवसेना कुटुंबाचा आणि दुधनीकर जनतेचा आहे. शहराच्या सर्वांगीण विकासासाठी प्रामाणिकपणे काम करू,' असा विश्वास व्यक्त केला. या ऐतिहासिक निकालामुळे दुधनी शहराच्या राजकीय समीकरणांमध्ये मोठा बदल झाला असून, आगामी काळात नगरपरिषदेच्या माध्यमातून विकासकामांना वेग मिळेल, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत.

## अक्कलकोट नगरपरिषद...

झाले आहेत, तर काँग्रेस पक्षाचा एक उमेदवार निवडून आला आहे.

मतमोजणीच्या प्रत्येक फेरीत भाजपचे उमेदवार आघाडीवर असल्याचे चित्र दिसून आले. निकाल जाहीर होताच अक्कलकोट शहरात भाजप कार्यकर्त्यांनी गुलाल उधळत, फटाके फोडून व घोषणाबाजी करत विजयाचा जल्लोष साजरा केला. शहरातील प्रमुख चौक व बसस्टॉप परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. विजयानंतर नवनिर्वाचित नगराध्यक्ष मिलन दादा कल्याणशेट्टी यांनी अक्कलकोटकर जनतेचे आभार मानले. ह्हा विजय जनतेच्या विश्वासाचा कौल आहे. शहराच्या सर्वांगीण विकासासाठी, पारदर्शक व लोकाभिमुख कारभार करण्याला प्राधान्य देऊ,ह्व असे त्यांनी सांगितले. या निकालामुळे अक्कलकोट नगरपरिषदेत भाजपचे निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित झाले असून, आगामी काळात पाणीपुरवठा, रस्ते, स्वच्छता, आरोग्य व नागरी मूलभूत सुविधांच्या विकासकामांना गती मिळेल, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

## भगीरथ भालके यांनी तब्बल...

पंढरपूर नगरपरिषद निवडणुकीत भाजपचे आमदार समाधान आवताडे आणि माजी आमदार प्रशांत परिचारक यांना धक्का देत भगीरथ भालके यांनी तब्बल 14 वर्षानंतर सत्तांतर घडवून आणले आहे. आमदार (स्व.) भारत भालके यांच्या सूनबाई प्रणिता भालके ह्या तब्बल 11 हजार 138 इतक्या मोठ्या मताधिक्यांनी नगराध्यक्षपदी निवडून आल्या आहेत. पंढरपूर नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत विजय मिळवित भगीरथ भालकेंनी विधानसभा निवडणुकीत झालेल्या पराभवाचे उट्टे काढल्याचे मानले जात आहे. पंढरपूरमध्ये नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत तीर्थक्षेत्र विकास आघाडीकडून प्रणिता भालके, तर भाजपकडून श्यामल शिरसाट यांना उमेदवारी देण्यात आली होती. प्रचारात दोन्ही बाजूंकडून अटीतटीचा प्रचार झाला होता. दोन्ही पॅनेलने प्रचारात आघाडी घेतली होती, त्यामुळे पंढरपूरच्या निकालाबाबत उत्सुकता होती. यापूर्वी (स्व.) आमदार भारत भालके यांच्या नेतृत्वाखाली 2011 मध्ये तीर्थक्षेत्र विकास आघाडीने सत्ता मिळवली होती. त्यानंतर भारत भालके यांच्या सूनबाई प्रणिता भालके यांच्या नेतृत्वाखाली तीर्थक्षेत्र विकास आघाडीने बाजी मारली. विधानसभा निवडणुकीत भगीरथ भालके यांचा अवघ्या 8,430 मतांनी पराभव झाला होता. पंढरपूर नगरपरिषद निवडणुकीत परिचारकांच्या सत्तेला सुरुंग लावत भगीरथ भालके यांनी त्या पराभवाचे उट्टे काढल्याचे मानले जात आहे.

## प्रबोधन

# चिकित्सेने बुद्धी। निवडते सत्य

बहुतेक लोक आपलं जीवन बुद्धिविना, विचाराविना, तर्काविना, चिकित्सेविना, संशोधक बुद्धीविना, जिज्ञासेविना, तक्रारीविना, सुधारणेविना, जसं जमेल तसं जगत असतात आणि परीक्षेविना जगावं अशीच त्यांची मानसिकता आणि आंतरिक इच्छाही असते. १०० पैकी ९९ परीक्षार्थीना अभ्यास चालेल; पण परीक्षा नको, असंच वाटत असतं. परीक्षेची आवड जितकी कमी तितकी गुणवत्ता कमी, हे ओघाने येतंच. म्हणूनच लाखो विद्यार्थ्यांपैकी फार थोडे गुणवत्ता यादीत झळकतात. विचारवंतांनी व्यावहारिक जीवनाला माणसाचा गुरू किंवा कठोर शिक्षक म्हटलं आहे. हा शिक्षक पुढे शिक्षित-अशिक्षित सर्वांना आपल्या मुक्त विद्यापीठात भरती करून त्यांची रात्रंदिवस परीक्षा घेत असतो. व्यवहाराच्या परीक्षेत जे नापास होतात, त्यांच्यावर अव्यवहारीपणाचा शिक्का न चुकता मारला जातो. या परीक्षेत शालेय जीवनात गुणवत्ता प्राप्त करणारे काही बुद्धिमान अव्यवहारी ठरतात आणि निर्बुद्धांच्या संख्येत आणखी काही अंश वाढतात.

शालेय परीक्षा देणे, ही बुद्धिमत्तेची पहिली कसोटी असली, तरी परीक्षकपदापर्यंत जाणं ही त्याहून वरची कसोटी असते. जो बुद्धिमान तो माणूस, ही माणसाची व्याख्या त्यानंतर करावी लागते. प्रत्येक गोष्टीची परीक्षा जो घेत राहातो, तो खरा जीवनवीर आणि त्याचं जगणं हाच त्याचा जीवनावरील विजय !परीक्षा घेत राहिलेला मनुष्य जगण्याच्या कलेत कुशल होत जातो. एक सुभाषित म्हणतं, 'किमशक्य बुद्धिमतां ?' अर्थात, परीक्षा घेतल्याशिवाय जो काहीच स्वीकारीत नाही, अशा बुद्धिमान माणसाला जगात काय अशक्य आहे? केशवसुत सामान्य लोकांचा उपहास करताना म्हणतात, फोले पाखडता तुम्ही, निवडतो ते सत्त्व आम्ही निके । अर्थात, जीवनसत्त्व निवडणं, आचार-विचार, आहार-विहार, व्यक्ती आणि समाजगत व्यवहारातील योग्य-अयोग्य, देवधर्मातील इष्ट-अनिष्ट, राजकारणातील अर्थ- अनर्थ हे सारं परीक्षित असेल तर असा परीक्षक आपलं जीवन तर आनंदाने व्यतीत करतोच. शिवाय त्याच्या प्रभावाखाली येणाऱ्या इतर सर्वांचं जीवनही सुखी, समृद्ध आणि सफल होऊन जाईल.

जगाच्या विविध क्षेत्रांतील ज्ञान- विज्ञान उत्तरोत्तर विकसित होत चाललं आहे. पण ते स्वीकारण्यासाठी माणसाचं मन ग्रहणशील असलं पाहिजे. पण आज ज्ञानक्षेत्रातील सहभागी घटकांचं अज्ञान ही चिंतेची बाब होऊन राहिली आहे. जीवनासाठी जी सारासार बुद्धी (commonsense) आणि व्यावहारिक बुद्धीची गरज असते, ती आजच्या शिक्षणातून, परीक्षांमधून, शिक्षणक्षेत्रातून न मिळाल्याने उच्चशिक्षितही किंकर्तव्यमूढ, चाकोरीबद्ध, हेकेखोर, पूर्वग्रहबाधित, पारंपरिकताग्रस्त, पुराणपंथाभिमानी, धर्माभिमानी, रूढिप्रिय, समाजविन्मुख, वैफल्यग्रस्त, भक्तीमुक्तीच्या मार्गावरील वाटसरू म्हणजेच समाजिकदृष्ट्या वाया गेलेले दिसून येतात. शिक्षक, प्राध्यापक, कुलगुरू ही माणसं जर पारंपरिक ज्ञानात गटांगळ्या खाऊ लागली, वेद-उपनिषदाच्या भाषेतच बोलू लागली, यज्ञ, अग्निहोत्र, गायत्री जपाविषयी प्रेम बाळगू लागली, तर शिक्षणक्षेत्रात अतिरेकी घुसले, असंच त्यांचं वर्णन करावं लागेल. ज्ञानक्षेत्रात अधिकारी व्यक्तींनी चिकित्सकपणाने तयार केलेली एक प्रश्नपत्रिका सतत जवळ बाळगावी. वेदापासून जनुकशास्त्र - अंतरिक्ष विज्ञानापर्यंत ज्ञानातील उत्तरं तिच्या आधारे शोधावीत आणि निर्भयपणे ती समाजापुढे मांडावीत. पगड्या - उपरणी घालून अग्निहोत्र प्रेमी, ज्योतिष (अ) विद्या प्रेमी- आत्मज्ञानवादी चैतन्यवादी तथाकथित बुद्धिवान आणि अज्ञानी माणूस, यात मग फरक कसा करणार? ज्यांनी बुद्धिवाद सोडला त्यांचा अधःपात झालाच म्हणून समजावं. कारण-

बुद्धी हीच आहे। गतिमान शक्ती
श्रद्धेने प्रगती होत नाही ॥१
बुद्धीचा विकास । जीवना सुखवी
जीवना कुजवी। श्रद्धा सदा ॥२
बुद्धी पक्व फळ । श्रद्धा कुजलेले
पक्व ते चांगले। दुजे टाका ॥३
चिकित्सेने बुद्धी । निवडते सत्य
श्रद्धेने बोथट होते प्रज्ञा ॥४
मुख्य आहे ज्ञान। त्यातून विचार
त्यातून आचार। येत राहो ॥५
बुद्धिजीवी व्हावे। साधाया प्रगती
सत्याश्रयी होती। धन्य तेचि ॥६



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

# श्रावणी सूर्यवंशी ने राष्ट्रीय स्पर्धेत पटकावले सलग ३ गोल्ड मेडल

**दिल्ली (वृत्त सेवा):-** 12 ते 17 डिसेंबर दरम्यान दिल्ली येथील डॉ. शामाप्रसाद मुखर्जी स्विमिंग पुल कॉम्पलेक्स येथे संपन्न झालेल्या 69 व्या नेशनल स्कूल गेम्स स्विमिंग ॲण्ड डायव्हिंग या राष्ट्रीय स्पर्धेत, सोलापूरच्या श्रावणी प्रताप सूर्यवंशी हीने महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करताना डायविंग या क्रीडा प्रकारात 19 वर्ष वयोगटात खेळताना तीन सुवर्ण पदकासह हॅट्रीक साधली आहे. श्रावणी ही देगांव येथील स्व. सौ. मिनाताई माँसाहेब ठाकरे क्रिडा व शिक्षण प्रसारक मंडळ संचलित कला व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय ची विद्यार्थिनी आहे. या स्पर्धेत श्रावणी ने महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले असून, दि.13 डिसेंबर रोजी डायव्हींग मधील 3 मी. स्प्रिंग बोर्ड मध्ये खेळताना 273.95 गुणासह श्रावणीने गोल्ड मेडल पटकावले., तर दि.15 डिसेंबर रोजी झालेल्या हायबोर्ड मध्ये खेळताना 271.00 गुणासह दुस-या सुवर्ण पदकावर नांव कोरले. याच क्रीडा प्रकारातील 1 मीटर स्प्रीग बोर्ड ची स्पर्धा दि.16 डिसेंबर रोजी पार पाडली असून, यामध्ये श्रावणी ही 245.10 गुणासह तिस-या सुवर्ण पदकाची मानकरी ठरली.

या स्विमिंग व डायव्हींग राष्ट्रीय स्पर्धेत देशातील महाराष्ट्र,



तमिळनाडू, मध्यप्रदेश, कर्नाटक, पश्चिम बंगाल, केरळ, तेलंगणा, मणिपूर, गुजरात, गोवा, आसाम, हरियाणा, राजस्थान, छत्तीसगड, उत्तरप्रदेश, दिल्ली, पंजाब या राज्यातील व केव्हीएस, सीआयएससीइ, आयबीएसएसओ, विद्या भारती, च्या मुलीनी सहभाग नोंदविला. या स्पर्धेत सोलापूरच्या एकटया श्रीवणी सुर्यवंशी ने 3 गोल्ड मेडल मिळवत हॅट्रीक साधत मोलाचा वाटा उचलला.

श्रावणीने आजवर डायव्हींग क्रीडा प्रकारामध्ये शालेय आणि फेडरेशन च्या वतीने घेतल्या गेलेल्या स्पर्धेत -

- राज्य पातळीवर २५ गोल्ड, 6 सिल्वर, 1 बाँझ
- राष्ट्रीय पातळीवर 20 गोल्ड, 5 सिल्वर, 2 बाँझ,
- आतंरराष्ट्रीय २ गोल्ड, 4 सिल्वर, 2 बाँझ
- एकूण - 47 गो ल्ड , 15 सिल्वर, 5 ब्राँझ

यप्रमाणे तिने एकूण 67 पदके वयाच्या अवघ्या 17 व्या वर्षात आपल्या नावांवर केली आहेत. यासाठी तिला, तिचे आंतरराष्ट्रीय दजार्चे कोच श्रीकांत शेटे सरांचे मोलाचे मार्गदर्शन लाभत आहे

या कामगिरीसाठी, दि. 17 डिसेंबर रोजी, दिल्ली येथील संसंद भवन आवारात, सोलापूर च्या विदयमान खासदार प्रणितीताई शिंदे यांनी श्रावणी चा सत्कार करुन तिचे कौतुक केले आहे व तिचे पुढील कारकीदीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

तसेच स्व.सौ.मीनाताई ठाकरे (माँसाहेब) क्रिडा व शिक्षण प्रसारक मंडळ संचलित कला व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय देगांव, तालुका उत्तर सोलापूर संस्थेचे अध्यक्ष दत्तात्रय वानकर, विश्वस्त विठ्ठल वानकर, प्राचार्य खांडेकर आर वी क्रीडाशिक्षक श्री बेलुरे तसेच सर्व शिक्षकवृंद व कर्मचारीवृंद यांनी श्रावणीचे अभिनंदन करून हे यश अभिमानास्पद असल्याच्या भावना व्यक्त केल्या आहेत.

# उत्पादकता वाढविण्यासाठी मिशन नैसर्गिक शेती राबविणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**नागपूर (वृत्त सेवा):-** शेतीची उत्पादकता आणि गुणवत्ता वाढविण्यासाठी मिशन नैसर्गिक शेती राबविण्याचे राज्य सरकारने ठरविले असून, येत्या २ वर्षात २५ लाख हेक्टर जमीन नैसर्गिक शेती लागवडीखाली येईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. लक्ष्मीनारायण इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (एल.आय.टी.) माजी विद्यार्थी संघटनेतर्फे आयोजित उडान संमेलनात ते बोलत होते. सत्यनारायण नूवाल आणि पद्मश्री डॉ. डी. के. यादव प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. याप्रसंगी डॉ. आर. एल. सोनोलिकर, अरुण दांडेकर यांना जीवन गौरव प्रदान करण्यात आला.



तसेच लाइफ टाइम अचिव्हमेंट दीपक लव्हाळा यांना, ज्वेल ऑफ एलआयटी डॉ. सुगंधा गारवे, कीर्ती गणोरकर, आर.जी. कृष्णन, अमित सिन्हा, नीरा चंदना यांना, तर युथ आयकॉन पुरस्कार चिंतन शाह यांना मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

आज सर्वच क्षेत्रात एआयचा वापर होतो आहे. ती काळाची गरज आहे, त्यामुळे एल आय टी सारख्या संस्थानी मोठ्या प्रमाणात एआयचा स्वीकार करावा, असे आवाहन करुन मुख्यमंत्री म्हणाले की, हे झाले तर जागतिक स्तरावरील स्पर्धेसाठी आपण विद्यार्थी घडवू शकू.

## वात्रटिका

### निकाल लागला

गुलाल उधळीत ढोल
वाजवत कोणाचा थाट...
आशा लावून बसले कोणी
झाले की भुईसपाट...
किती आटापिटा केला पण
खूचीर्शी नाते जडले नाही...
मनसुबे रचले होते किती तरी
पण घडायचे ते घडले नाही...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# योगीराजेंद्र शिवाचार्य महास्वामी जींच्या पादुकांची मिरवणूक उत्साहात





**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** श्री बृहन्मठ होटगी मठाचे परमपूज्य गुरुवर्य तपोरत्न योगीराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजी यांच्या आठव्या पुण्यस्मरणानिमित्त निलम नगर येथील नेताजी सुभाषचंद्र बोस कन्नड भाषा व कन्नड संस्कृती संवर्धक कुंभार समाज शिक्षण प्रसारक मंडळाच्यावतीने श्रीगुरुंच्या पादुकांची भव्य मिरवणूक काढण्यात आली. प्रथम अशोक चौक येथील नेताजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अण्णाराव कुंभार यांच्या निवासस्थानी 'श्री'च्या पादुकांची रुद्राभिषेक व सहस्त्र बिल्वार्चन महापूजा काशी पीठाचे जगद्गुरु श्री श्री श्री १००८ डॉ. मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामीजी यांच्या दिव्य सानिध्यात पार पडली. यावेळी श्री बृहन्मठ होटगी मठाचे मठाधिपती श्री बालपस्वी चन्नयोगीराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजी, चिट्टगुपाचे श्री गुरुलिंग शिवाचार्य महास्वामीजी, वडांगळीचे श्री पंडिताराध्य शिवाचार्य महास्वामीजी उपस्थित होते. विठ्ठल कुंभार व रूपा कुंभार या दांपत्याच्या हस्ते श्री गुरूंच्या पादुकांची विधिवत महापूजा पार पडली. वेदमूर्ती धानय्या मठपती, शिवानंद स्वामी, विश्वाराध्य मठपती यांनी धार्मिक विधिवत पौरोहित्य केले. त्यानंतर जगद्गुरु डॉ. मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामीजी व उपस्थित सर्व शिवाचार्यांचे संस्था अध्यक्ष अण्णाराव कुंभार परिवाराच्यावतीने पाद्यपूजा व गुरूंचा सन्मान करण्यात आला. महापूजेनंतर पुरवंतासह व पारंपरिक वाद्यवृंदानी मिरवणुकीला प्रारंभ झाला. फुलांनी सजवलेल्या पालखीत महास्वामीजींची प्रतिमा व महास्वामीजींच्या पादुकां तसेच मोठ्या बग्गीत महास्वामीजींची मोठी प्रतिमा, नेताजी सुभाषचंद्र बोस शिक्षण संस्थेच्या विविध शाखेतील लेझीम पथक, टिपरी पथक, नृत्य पथक, ढोल पथक व विविध संतांच्या व देवदेवतांच्या सजीवातील बालकलाकारासह हजारो भक्तगणांच्या उपस्थितीत मिरवणूक निलम नगरकडे मार्गस्थ झाली. सनई, पूरवंत , श्री ची पालखी, बग्गीतील प्रतिमा, सुहासिनींची आरती पथक अशा क्रमाने शिस्तबद्ध रीतीने मिरवणूक काढण्यात आली. ठिकठिकाणी भाविक भक्त पालखीचे स्वागत करुन श्रीगुंरुच्या पादुकांचे दर्शन आशिर्वाद घेत होते. महिला भाविकांनी आरती करून आशिर्वाद घेत होते. राजराजेश्वरी शाळेतील ओंकार भाईकट्टी( शंकर ),श्रद्धा आहेरवाडी (पार्वती), विशाल सुलगुडले (गणपती ),हर्षिता उसाकोयल (रिद्धी), वैष्णवी पलवंचा( सिद्धी), नेताजी प्राथमिक शाळेतील आदित्य बिराजदार (सिद्धेश्वर महाराज), राज दोडमणी (महात्मा बसवेश्वर), स्वराज्य जाधव(मन्मथ स्वामी),समृद्धी पगड्याकुल (अक्क महादेवी) श्रेया काटमोरे (हेमरेड्डी मल्लम्मा), नेताजी इंग्लिश मिडीयम स्कूलच्या प्रांजल बनसोडे (झाशीची राणी), ओंकार डोंगराजे (महादेव) ऋषिकेश वन्नम (महास्वामीजी) ओंकार सानप(विठ्ठल) नैनाक्षा मेरगु (रुक्मिणी) आदी बालकलाकारांनी विविध संत, महात्मा व देवदेवतांच्या वेशभूषेत आकर्षक दिसत होते. मिरवणूक पाच्छा पेठ, जुना कुंभारी नाका, आकाशवाणी केंद्र, नीलम नगर, शरण मठ,थोबडे नगरमार्गे नेताजी प्रशालेकडे मार्गस्थ झाली.

ठीक अकरा वाजता प्रशालेच्या प्रांगणात आल्यानंतर शाळेच्यावतीने स्वागत करण्यात आले.पुन्हा प्रत्येक पथकाने आपली कला सादर केल्यानंतर महामंगल आरतीने मिरवणुकीची सांगता झाली. श्रीगुंरुच्या पादुका दिवसभर दर्शनासाठी ठेवण्यात आले होते.यावेळी सर्व सदभक्तांना महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली होती. मिरवणूक दरम्यान सिद्धाराम खजूरगी, राहुल गंदुरे, पवन देसाई, उडचान ,मामड्याल यांनी विद्यार्थ्यांना पाणी वाटप केले. दरम्यान ठिकठिकाणी मल्लिनाथ जमखंडी यांनी आकर्षक रांगोळी काढून सेवा समर्पित केले.मिरवणुकीत संस्था अध्यक्ष अण्णाराव कुंभार, खजिनदार ललिता कुंभार, गुरुशांत धुतरगावकर, राजशेखर फताटे, सिद्धेश्वर नरोळे, सुभाष धुमशेट्टी, विजयकुमार हुल्ले, रेवणसिद्ध रोडगीकर, राजशेखर स्वामी, महांतेश कौलगी, षडाक्षरी स्वामी, सिद्धलिंग मठमारी, ज्ञानेश्वर म्हेत्रे धर्मराज बळ्ळारी, लक्ष्मीकांत त्रिशुले, प्राचार्य रविशंकर कुंभार, मुख्याध्यापक शिवानंद मेणसंगी, मुख्याध्यापिका वैशाली कुंभार, मुख्याध्यापिका विजयालक्ष्मी कुंभार, पर्यवेक्षक गौरीशंकर आळंगे यांच्यासह नेताजी शिक्षण संस्थेतील सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी वृंद सहभागी झाले होते.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी जयश्री बिराजदार, अशोक पाटील, सुरेश बिराजदार, अंगद तोरणे, चंद्रशेखर पाटील, विनायक कोरे, शिवानंद पुजारी, सिद्धाराम कुंभार, संतोष प्रचंडे, हनुमंत कुरे, वैशाली गुजर, प्रशांत बत्तुल, जगदेवी निंबर्गी, राजश्री कोळी,आदींनी विशेष परिश्रम घेतले. सुत्रसंचलन शितल पाटील यांनी केले.

# सोलापूरात गुरुवारी मनोरमा राज्यस्तरीय साहित्य संमेलन

## परिसंवाद, काव्य मैफिलीसह विविध कार्यक्रमांची पर्वणी



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** मनोरमा सोशल फाउंडेशन संचलित, मनोरमा साहित्य मंडळी सोलापूर, महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे, शाखा पश्चिम (मनोरमा) सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने मनोरमा राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलन 2025 चे आयोजन गुरुवार, दि. 25 डिसेंबर रोजी हॉटेल बालाजी सरोवर येथे करण्यात आले आहे.परिसंवाद, काव्य मैफिलीसह विविध साहित्य कार्यक्रमांची पर्वणी मिळणार आहे. मनोरमा पुरस्काराने 10 मान्यवरांचा सन्मान करण्यात येणार आहे, अशी माहिती मनोरमा परिवाराचे मार्गदर्शक तथा साहित्य संमेलनाचे अध्यक्ष श्रीकांत मोरे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या संमेलन स्थळाला सदाशिवराव मोरे साहित्य संमेलन सभागृह असे नाव देण्यात आले आहे. श्रीकांत मोरे यांच्या अध्यक्षतेखाली हे संमेलन होणार आहे. संमेलनाचे स्वागताध्यक्ष शोभा मोरे, कार्याध्यक्ष अस्मिता गायकवाड, आधारस्तंभ माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे, हर्षवर्धन पाटील हे आहेत. गुरुवार दि. 25 डिसेंबर रोजी सकाळी 9.30 वाजता 99 व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष विश्वास पाटील यांच्या हस्ते संमेलनाचे उद्घाटन होणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर, अखिल भारतीय साहित्य महामंडळाचे अध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी, गोवा अकादमीचे अध्यक्ष अनिल सामंत, महाराष्ट्र शासनाच्या मराठी विश्वकोश मंडळाचे अध्यक्ष रवींद्र शोभणे, माजी कामगार उपायुक्त संभाजीराव काकडे, ज्येष्ठ साहित्यिक रामदास फुटाणे, ज्येष्ठ पत्रकार राजा माने, मनोरमा साहित्य संमेलनाचे कार्यवाह संतोष सुरवसे, संयोजक डॉ. सुमित मोरे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

दुसऱ्या सत्रात सकाळी 11:45 वाजता विश्वास पाटील यांची प्रकट मुलाखत अश्विनी कोळेकर घेणार आहेत. तिसऱ्या सत्रात 12.30 वाजता अध्यक्ष श्रीकांत मोरे यांची मुलाखत जयू भटकर, शिल्पा देशपांडे आणि अश्विनी कोळेकर घेणार आहेत. यावेळी नागेश पवार व सहकारी कविता सादरीकरण करणार आहेत. चौथ्या सत्रात दुपारी 1.30 'मराठी भाषा महाराष्ट्र आणि महाराष्ट्र बाहेर' या विषयावर दयानंद महाविद्यालयाचे प्रा. डॉ. राजशेखर शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली परिसंवाद होणार असून त्यामध्ये डॉ. रवींद्र शोभणे, राजा माने, माजी शिक्षण उपसंचालक प्रदीप मोरे, ज्येष्ठ साहित्यिक राजेंद्र दास यांचा सहभाग राहणार आहे. पाचव्या सत्रात दुपारी 3.45 वाजता काव्य मैफिल कार्याध्यक्षा अस्मिता गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे.

सहाव्या सत्रात दुपारी 4.15 वाजता 'मराठी चित्रपट सामना 50 वर्षापूर्वी व आता' या विषयावर रामदास फुटाणे हे भाष्य करणार आहेत. सातव्या सत्रात 4.45 वाजता गायक वैभव जोशी यांची प्रकट मुलाखत शिल्पा देशपांडे घेणार आहेत. आठव्या सत्रात दुपारी 5.15 वाजता पुरस्कार वितरण सोहळा होणार आहे. यावेळी विश्वास पाटील, डॉ. प्रकाश महानवर, संभाजीराव काकडे, मिलिंद जोशी, रवींद्र शोभणे, अनिल सामंत, रामदास फुटाणे, संदीप काळे, राजन लाखे, सुनिताराजे पवार, सुमित मोरे, आदेश पायगुडे, जयू भाटकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. यावेळी 'तणावविरहित जीवनशैली' या विषयावर डॉ. मृणालिनी मोरे, डॉ. तनुजा चिकने, डॉ. संदीप तांबारे, कविता अंधारे, संतोषी सुतार यांची व्याख्याने होणार आहेत. यानंतर नागेश पवार व त्यांचे सहकारी भैरवी सादरीकरण करणार आहेत.

या पत्रकार परिषदेला शोभा मोरे, डॉ. ऋचा मोरे, अस्मिता गायकवाड, शिल्पा कुलकर्णी–मोहिते, पद्माकर कुलकर्णी, मारुती काटकधोंड, विठ्ठल काळे, बदिउज्मा बिराजदार आदींसह पदाधिकारी उपस्थित होते.

### हे आहेत विविध पुरस्कारांचे मानकरी

या संमेलनात विविध पुरस्कारांनी मान्यवरांचा सन्मान केला जाणार आहे. यामध्ये गोव्याचे अनिल सामंत यांना मनोरमा बँक राज्यस्तरीय जीवनगौरव पुरस्कार, वैभव जोशी यांना मनोरमा बँक राज्यस्तरीय काव्यरत्न पुरस्कार, डॉ. मनीषा अतुल,अपूर्वा जोशी, संदीप काळे, डॉ. शिवाजी शिंदे यांना मनोरमा मल्टीस्टेट पुरस्कृत मनोरमा राज्यस्तरीय साहित्य सेवा पुरस्कार, नीलकंठ कदम, शिल्पा देशपांडे, अंजली करंजकर, सुनील साळुंके यांना स.रा. मोरे ग्रंथालयातर्फे मनोरमा राज्यस्तरीय साहित्य पुरस्कार देण्यात येणार आहे.

### यांचा होणार यथोचित सत्कार

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, पोलीस आयुक्त एम. राजकुमार, महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे, पोलीस उपायुक्त विजय कबाडे, आयर्न मॅन डॉ. अभिजीत वाकचौरे, डॉ. सत्यजित वाकचौरे, जिल्हा सरकारी वकील प्रदीपसिंग राजपूत, ना.म.शिंदे, कृष्णा इंगोले , डॉ. नसीम पठाण, डी.बी.पाटील, राजेंद्र पवार आदी मान्यवरांचा यथोचित सत्कार करण्यात येणार आहे.

# राजकीय पक्षांनी मूळ ओबीसी उमेदवारांनाच संधी द्यावी

## ओबीसी आरक्षण बचाव समितीची मागणी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** महापालिका निवडणुकीत विविध राजकीय पक्षांची मोर्चे मागणी सुरू आहे. या निवडणुकीत राजकीय पक्षांनी मूळ ओबीसी उमेदवारांनाच संधी द्यावी. जात पडताळणी प्रमाणपत्र पाहूनच उमेदवारी द्यावी, अशी मागणी ओबीसी आरक्षण बचाव समितीच्या वतीने ॲड. राजन दीक्षित यांनी पत्रकार परिषदेत केली आहे.

राज्यात 29 महापालिकेच्या निवडणुकीच्या कार्यक्रम जाहीर झाला आहे. सोलापूर महापालिकेत एकूण 102 नगरसेवक आहेत.

महापालिकेत ओबीसी वर्गासाठी 27 टक्के आरक्षण असून 27 जागा या ओबीसींसाठी आरक्षण ठेवले आहेत. दरम्यान, ओबीसी आरक्षणात घुसखोरी सुरू आहे असा आरोप करत सर्वच राजकीय पक्षांनी मूळ ओबीसी उमेदवारांनाच संधी देऊन सामाजिक न्याय द्यावा अशी अपेक्षा ॲड. राजन दीक्षित यांनी व्यक्त केली आहे.

मूळ ओबीसींनाच राखीव जागेवर उमेदवारी देण्यासाठी काही राजकीय पक्षांनी भूमिका जाहीर केली आहे. इतर पक्षांनीही तशी भूमिका जाहीर करावी. येत्या महापालिका निवडणुकीमध्ये मूळ ओबीसी उमेदवारांना डावल्यास 25 डिसेंबर नंतर निर्णय घेणार आहे, असेही ॲड. राजन दीक्षित यांनी स्पष्ट केले.

या पत्रकार परिषदेस डॉ. माधुरी पारपल्लीवार, शेखर बंगाळे, शिवराज बंगाळे आदी उपस्थित होते.

# उमेदवारांनी सादर करावयाच्या ना-हरकत कागदपत्रांची पूर्तता वेळेत करावी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५–२६ करीता नामनिर्देशन अर्ज दाखल करताना उमेदवारांना महानगरपालिकेकडून विविध ना–हरकत प्रमाणपत्रे (NOC) सादर करणे अनिवार्य राहणार आहे. याबाबत सर्व इच्छुक उमेदवारांनी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता वेळेत करावी, असे आवाहन करण्यात येत आहे.

निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या नावावर असलेल्या मालमत्तेसंदर्भात मालमत्ता कराची ना–हरकत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. उमेदवाराच्या नावावर गाळा (दुकान) असल्यास त्याबाबत स्वतंत्र ना–हरकत प्रमाणपत्र द्यावे लागेल. तसेच उमेदवाराच्या मालकीची खुली जागा असल्यास, त्या मिळकतीबाबतही संबंधित विभागाकडून ना–हरकत प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे.उमेदवार व्यवसाय करीत असल्यास, संबंधित व्यवसाय परवाना (लायसन्स) वैध असल्याबाबतची कागदपत्रे जोडावी लागतील. याशिवाय, उमेदवार महानगरपालिकेमध्ये मक्तेदार (ठेकेदार) आहे किंवा नाही, याबाबतचा सविस्तर तपशील देणे आवश्यक असून, त्यासंबंधीची माहिती लेखी स्वरूपात सादर करावी लागणार आहे.

वरील सर्व बाबींविषयी उमेदवारांनी स्वयंघोषणापत्र (Self Declaration सुद्धा अनिवार्यपणे सादर करावे लागेल. स्वयंघोषणापत्रामध्ये दिलेली माहिती सत्य व अचूक असल्याची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहणार आहे.सर्व इच्छुक उमेदवारांनी नामनिर्देशन अर्ज दाखल करण्यापूर्वी वरील सर्व कागदपत्रांची पूर्तता करून ठेवावी. सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने 21 –12 – 2025 पासून ना हरकत प्रमाणपत्रासाठी एकल खिडकी नॉर्थकोट प्रशाला येथे सुरू करण्यात येणार असून दुपारी दोन ते सहा या कालावधीत ना हरकत दाखले वितरित करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच सर्व इच्छुक उमेदवारांनी शक्य होईल तितके लवकर आपले अर्ज एक खिडकी येथे सादर करण्यात यावे असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.

# एस. व्ही. सी. एस. प्रशालेत पालखी सोहळा उत्साहात संपन्न



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** परमपूज्य तपोरत्न योगीराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजी यांच्या आठव्या पुण्याराधनानिमित्त एस. व्ही. सी. एस. हायस्कूल एमआयडीसी येथे पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. प्रथमतः काशी जगद्गुरु डॉ. मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामीजी यांच्या अमृत हस्ते पालखीची पूजा करण्यात आली. यावेळी चिटगुपाचे गुरुलिंग शिवाचार्य महास्वामीजी, वडांगळीचे पंडिताराध्य महास्वामीजी व बृहन्मठाध्यक्ष चन्नयोगीराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजी यांची प्रमुख उपस्थिती होती. पालखी पूजनानंतर मिरवणुकीला सुरुवात झाली. या मिरवणुकीत मुलींचा लेझीम पथक, मुलांचे ध्वज पथक, नमो शंकरा नृत्य पथक, विद्यार्थिनी डोक्यावर कलश घेऊन,शंकर– पार्वती व पूज्य महास्वामीजींचा वेशभूषा परिधान करून मिरवणुकीत सहभागी झाले होते. ही मिरवणूक राजीव नगर, किसान नगर या मार्गावरून निघाली. मिरवणूक मार्गात भक्तांनी घरासमोर रांगोळी काढून मिरवणुकीचे स्वागत केले व पालखीचे पूजन करून दर्शन घेतले. भक्ताकडून मिरवणुकीतील सहभागी विद्यार्थ्यांना पाणी, बिस्कीट व चहाची व्यवस्था करण्यात आली होती. या मिरवणुकीत प्रशालेचे मुख्याध्यापक संगप्पा म्हमाणे, उपमुख्याध्यापक धनंजय नकाते, पर्यवेक्षक संतोषकुमार तारके, प्रशालेतील सर्व शिक्षक– शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी भक्तीभावाने सहभागी झाले होते. यावेळी महामंगलारती करण्यात आली. वेदमूर्ती परमेश्वर शास्त्री हिरेमठ यांनी पौरोहित्य केले शेवटी सर्व विद्यार्थ्यांना प्रसादाचे वाटप करण्यात आले.

# नुतन नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी यांचा न्यासाच्या वतीने सत्कार



**अक्कलकोट:–** श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली अक्कलकोट नगरपरिषदेचे नुतन नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी यांच्यासह श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान समितीचे अध्यक्ष व जेष्ठ नगरसेवक महेश इंगळे, नुतन नगरसेवक अविनाश मडीखांबे यांचा न्यासाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

अक्कलकोट नगरपरिषदेच्या पंचवार्षिक निवडणूकीत घवघवीत यश संपादन केल्याबद्दल भारतीय जनता पक्षाचे नुतन नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी यांच्यासह श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान समितीचे अध्यक्ष व जेष्ठ नगरसेवक महेश इंगळे, नुतन नगरसेवक अविनाश मडीखांबे यांच्यासह सागर कल्याणशेट्टी, प्रथमेश इंगळे, मनोज कल्याणशेट्टी, शिवराज स्वामी यांचा देखील न्यासाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

यावेळी मनोज निकम, अभिजित लोकापुरे, प्रविण घाटगे, सुमित घाटगे, निखिल पाटील, न्यासाचे पुरोहित सोमनाथ पुजारी, संजय गोंडाळ, वैभव मोरे, विशाल कलबुर्गी, शुभम सावंत, राहूल इंडे, सतीश महिंद्रकर, शहाजीबापू यादव, नामा भोसले, बाळासाहेब घाडगे, राजू पवार, दत्ता माने, श्रीनिवास गवंडी, तानाजी पाटील, प्रसाद हुल्ले, शरद भोसले रमेश हेगडे, विनायक भोसले, धनंजय निंबाळकर, अनिल बिराजदार, चंद्रकांत हिबारे, रोहित कदम, एस के स्वामी, मल्लिनाथ कोगनुरे, शावरेप्पा माणकोजी, कल्याण देशमुख, विशाल घाडगे, विठ्ठल रेड्डी यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

# पाणी प्रश्न सोडवणाऱ्या नेतृत्वाचा सन्मान

## आण्णासाहेब बनसोडे यांचा पुण्यात सत्कार



**पुणे (कटूसत्य वृत्त):–** सोलापुरातील नागरिकांचा दीर्घकाळ प्रलंबित असलेला पाणी प्रश्न प्राधान्याने मार्गी लावण्यासाठी प्रभावी भूमिका घेतल्याबद्दल महाराष्ट्र विधानसभेचे उपाध्यक्ष श्रीयुत आण्णासाहेब बनसोडे यांचा पुणे येथे सत्कार करण्यात आला. हा सत्कार राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सोशल मीडिया विभागाचे शहराध्यक्ष वैभव गंगणे, तसेच मनोज चलवादी व सचिन चलवादी यांच्या वतीने करण्यात आला. यावेळी सोलापूर शहरातील पाणीपुरवठा, नागरी सुविधा, तसेच आगामी सोलापूर महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहराच्या विकासात्मक मुद्द्यांवर विधानसभा उपाध्यक्ष आण्णासाहेब बनसोडे यांच्यासोबत सखोल व सकारात्मक चर्चा झाली. सोलापूरच्या पाणी प्रश्नावर राज्य पातळीवर तातडीने निर्णय घेऊन तो मार्गी लावल्याबद्दल उपस्थितांनी त्यांचे विशेष आभार मानले. दरम्यान, विधानसभेचे उपाध्यक्ष श्रीयुत आण्णासाहेब बनसोडे यांचे सुपुत्र सिद्धार्थ बनसोडे हे पिंपरी–चिंचवड महानगरपालिका निवडणुकीच्या रिंगणात उतरले असून, रविवारी पुण्यात त्यांच्या प्रचाराचा जोरदार शुभारंभ झाला. या प्रचार रॅलीमध्ये सोलापुरातून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सोशल मीडिया विभागाचे शहराध्यक्ष वैभव गंगणे, संघटक सचिन चलवादी व मनोज चलवादी यांनी सहभागी होत सिद्धार्थ बनसोडे यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी युवकांची भूमिका महत्वाची असून, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी भक्कम यश संपादन करेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# ना-हरकत प्रमाणपत्रांसाठी एक खिडकी कक्षाला उत्स्फूर्त प्रतिसाद



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५–२६ करीता नामनिर्देशन अर्ज दाखल करताना उमेदवारांना महानगरपालिकेकडून विविध ना–हरकत प्रमाणपत्रे (NOC) सादर करणे अनिवार्य करण्यात आले आहे. या अनुषंगाने महापालिकेच्या वतीने नॉर्थकोट प्रशाला येथे सुरू करण्यात आलेल्या एक खिडकी कक्षाला उमेदवारांचा मोठा प्रतिसाद मिळत असून, आज पहिल्याच दिवशी तबल २३० अर्ज दाखल झाले आहे.निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या नावावर असलेल्या मालमत्तेसाठी मालमत्ता कराची ना–हरकत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. उमेदवाराच्या नावावर गाळा (दुकान) असल्यास त्यासाठी स्वतंत्र ना–हरकत प्रमाणपत्र घ्यावे लागणार असून, खुली जागा असल्यास त्या मिळकतीबाबतही संबंधित विभागाकडून एनओसी सादर करणे बंधनकारक आहे. तसेच उमेदवार व्यवसाय करीत असल्यास, संबंधित व्यवसाय परवाना (लायसन्स) वैध असल्याचे कागदपत्र जोडणे आवश्यक आहे.याशिवाय, उमेदवार महानगरपालिकेचा मक्तेदार (ठेकेदार) आहे किंवा नाही, याबाबतचा सविस्तर तपशील लेखी स्वरूपात सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. वरील सर्व माहितीबाबत उमेदवारांनी स्वयंघोषणापत्र (Self Declaration) सुद्धा अनिवार्यपणे सादर करावे लागणार असून, त्यामधील माहिती सत्य व अचूक असल्याची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहणार आहे. महापालिकेच्या वतीने दि. २१ डिसेंबर २०२५ पासून नॉर्थकोट प्रशाला येथे एक खिडकी कक्ष कार्यालयीन वेळेत सुरु असून, अर्ज सादर करण्यासाठी उमेदवारांची मोठी गर्दी होत असून, निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर इच्छुक उमेदवारांनी वेळेआधी सर्व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून आपले अर्ज एक खिडकी कक्षात सादर करावेत, उमेदवारांनी मिळकत करा संदर्भात ऑनलाईन ना हरकत प्रमाणपत्र काढून अर्ज सोबत जोडण्यात यावा.असे आवाहन सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

# राजश्री चव्हाण यांनी दिले पालकमंत्र्यांना निवेदन



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** सोलापूर महानगरपालिका निवडणूक 2026 जानेवारी महिन्यात होत आहे त्या अनुषंगाने प्रभाग क्रमांक 24 क प्रभाग क्रमांक 26 ब ह्या ठिकाणी निवडणूक आयोगाकडून एसटी आरक्षण जाहीर करण्यात आले आहे. त्या ठिकाणी भाजपचे निष्ठावंत, कट्टर समर्थक, जे पारदर्शक, पदवीधर, निष्कलंक, निस्वार्थी असावे असे खुद्द राज्याचे मुख्यमंत्री सन्माननीय देवेंद्रजी फडणवीस साहेब व भाजपा प्रदेश अध्यक्ष श्री रवींद्रजी चव्हाण साहेब यांनी सहमती दर्शवली आहे. तसेच पक्षात नव्याने आलेले आयाराम गयाराम यांना संधी देण्यात येणार नाही असेही म्हटलेले आहे.

त्या अनुषंगाने आज भाजपा अनुसूचित जमाती मोर्चा प्रदेश कार्यकारणी सदस्य तथा माजी नगरसेविका सौ राजश्री अनिल चव्हाण यांनी राज्याचे ग्राम विकास व पंचायत राज्य मंत्री तथा पालकमंत्री सोलापूर,आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी,आमदार सुभाष देशमुख,सोलापूर शहर अध्यक्ष सौ. रोहिणीताई तडवळकर,नव्याने भाजपमध्ये प्रवेश केलेले माजी आमदार तथा सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती श्री दिलीपराव माने यांना निवेदन दिले असून निवेदनात म्हटले आहे की आम्ही 2017 साली भाजपकडून उमेदवारी लढवली होती त्यावेळी प्रभाग क्रमांक 26 ब मधून सर्वाधिक मताधिक्याने निवडून आलेले आहे. सध्या मी भाजपा अनुसूचित जमाती मोर्चा प्रदेश कार्यकारणी सदस्य म्हणून कार्यरत असून संपूर्ण महाराष्ट्रभर फिरून भाजप पक्षाच्या व संघाच्या विचारधारा व भारताचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी साहेब व महाराष्ट्राचे लोकप्रिय मुख्यमंत्री सन्माननीय देवेंद्रजी फडणवीस साहेब यांनी केलेला विकास कामाच्या जोरावर व आदिवासी पारधी समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी केलेले प्रयत्न हे आम्ही महाराष्ट्रातील आदिवासी पारधी समाजाला समजावून सांगितल्यामुळे समस्त पारधी समाज हा भाजप पक्षाच्या पाठीशी उभा राहिला आहे. सध्या सोलापूर महानगरपालिका 2026 निवडणुका लागल्या असून प्रभाग 24 क मधून वृषाली अनिल चव्हाण व प्रभाग 26 ब मधून अशितोष अनिल चव्हाण हे आदिवासी पारधी समाजातील उच्चशिक्षित, पारदर्शक,पदवीधर निष्कलंक, निस्वार्थी असून इच्छुक उमेदवारी अर्ज भरला असून व मुलाखत दिलेल्या आहेत वरील ठिकाणी भाजप पक्षाकडून एबी फॉर्म दिल्यास ते १००% टक्के निवडून येतील. तसेच आम्ही प्रभाग 26 मध्ये 222 नगरामध्ये घराघरात पर्यंत पोहोचलो असून अनेक नगराच्या कायापालट केला असल्यामुळे सर्व सामान्य जनता आमच्या पाठीमागे असून त्यांचे मनोगत ही येत आहेत की आमचा विकास फक्त माजी नगरसेविका सौ राजश्री अनिल चव्हाण व त्यांचे नव्याने उमेदवारीसाठी इच्छुक असलेले चिरंजीव आशुतोष अनिल चव्हाण व मुलगी वृषाली अनिल चव्हाण हेच करू शकतात असे प्रभागातील सर्व सामान्य जनता सोशल मीडिया,व्हाट्सअप,फेसबुक, इंस्टाग्राम,वर आपले मनोगत व्यक्त करीत आहेत असे निवेदनात म्हटले आहे.

प्रवेश ! प्रवेश !! प्रवेश !!!

ग्रंथपालन प्रमाणपत्र परीक्षा
२०२६ प्रवेशासाठी आवाहन

ग्रंथालय संचालनालय, मुंबई यांच्या वतीने जानेवारी २०२६ ते जून २०२६ या सहा महिन्याच्या कालावधीत ग्रंथपालन प्रमाणपत्र प्रशिक्षण वर्ग चालणार आहेत. सुधारित अभ्यासक्रमानुसार प्रवेशा करता बारावी कोणत्याही शाखेत उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा ग्रंथालय संघामार्फत वर्ग चालविले जातात.

प्रवेशासाठी बारावीची गुणपत्रिका, शाळा सोडल्याचा दाखला, आधार कार्ड इत्यादींच्या प्रमाणीत प्रती आणि चार पासपोर्ट साईज फोटोसह संपर्क करावा. हा अभ्यासक्रम डि.एड. समकक्ष आहे. इच्छुकांनी डिसेंबर २०२५ मध्ये आपआपल्या जिल्हा ग्रंथालय संघाशी संपर्क साधावा.

–: संपर्क :–

सोलापूर जिल्हा ग्रंथालय संघ, सोलापूर
हुतात्मा स्मारक, मार्कंडेय उद्यान, अशोक चौक
पोलीस चौकी समोर सोलापूर 413005
संपर्क करिता मोबाईल नंबर
9890908320,7350922276,8308178551